# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय रामनगर सृष्टी,
मिरारोड पुर्व, जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेस नोट क्र-९९** **दिनांक - १८/०३/२०२४**

## मोटर सायकल चोरी करणाऱ्या आरोपीतास अटक करण्यात विरार गुन्हे प्रकटीकरण शाखेला यश.

विरार पोलीस ठाणे हद्दीत दि.०९/०३/२०२४ रोजी १९:००वा. ते २३:३०वा.चे दरम्यान अश्लेषा अपार्टमेंट समोर, विवा तारांगण, विरार(पु.), ता.वसई, येथे फिर्यादी यांची मालकी असलेली सिल्वर रंगाची इलेक्ट्रीक मोटर सायकल ही राहते बिल्डींगचे समोर पार्कीगमध्ये उभी करुन ठेवलेली असतांना, कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरी करुन चोरुन नेले बाबत फिर्यादी कु.महर्षित तेजम, वय-२० वर्षे, रा. अश्लेषा अपार्टमेंट समोर, विवा तारांगण, विरार(पु.), ता.वसई, यांनी दिलेल्या तक्रारीवरुन अज्ञात आरोपीतावर विरार पो.स्टे. गु.रजि.नं. I २१०/२०२४, भा.दं.वि.सं.कलम-३७९ प्रमाणे दि.१२/०३/२०२४ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला.

वर नमुद गुन्हयाचे अनुषंगाने विरार गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ गुन्हयाचे घटनास्थळी भेट देवुन, गुप्त बातमीदार यांचेमार्फत मिळालेल्या माहीतीच्या आधारे आरोपीत नामे. **महेश कांम्पली, वय-२२ वर्षे**, रा.नगिनदासपाडा, नालासोपारा(पु.), ता.वसई, यांस दि.१३/०३/२०२४ रोजी अटक केली आहे. नमुद आरोपीताकडे कौशल्यपुर्ण तपास केला असता, त्याचेकडून गुन्हयातील वेगवेगळया कंपनीच्या एकुण-०४ मोटर सायकल असा **एकुण-१,७०,०००/- रुपये किंमतीचा** १०० टक्के **मुद्देमाल हस्तगत** करण्यात आला आहे. नमुद आरोपीत याचेकडून खालील प्रमाणे गुन्हे उघडकीस आले आहेत.

| अ.क्रं. | पोलीस ठाणे | गु.रजि.नं. व कायदा कलम |
|---|---|---|
| १ | विरार | गु.रजि.नं. I २१०/२०२४,भा.दं.वि.सं.कलम-३७९ प्रमाणे **(मुळ गुन्हा)** |
| २ | विरार | गु.रजि.नं. I ८४१/२०२०, भा.दं.वि.सं. कलम-३७९ प्रमाणे |
| ३ | तुळींज | गु.रजि.नं. I १६७/२०२४, भा.दं.वि.सं. कलम- ३७९ प्रमाणे |
| ४ | नारपोली, ठाणे शहर | गु.रजि.नं. I १०५८/२०२३, भा.दं.वि.सं. कलम- ३७९ प्रमाणे |

सदरची कामगिरी श्री.सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ-३, विरार, श्री.बजरंग देसाई, सहायक पोलीस आयुक्त सो, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली विरार पोलीस ठाणेचे श्री.विजय पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो, श्री.सुशिलकुमार शिंदे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि/ज्ञानेश फडतरे, पोउपनि/अविनाश हाटखिळे, पोहवा/सचिन लोखंडे, संदिप जाधव, विशाल लोहार, इंद्रनिल पाटील, संदिप शेरमाळे, पोअं/संदिप शेळके, मोहसिन दिवाण, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, रोशन पुरकर, दत्तात्रय जाधव, यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

------////------